(TM)
महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२-२६४७६२३३, २६४७२३१८

क्र.पी.आर-३/जीवन संजीवनी No 28843 दिनांक : 31 AUG 2009

## वाणिज्य परिपत्रक क्र. १००

**विषय : ग्रामिण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी लागू करण्यात आलेल्या जीवन संजीवनी योजन बाबत.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. ग्रापाभो-११०९/प्र.क्र. ०२०/पापु- ०७ दिनांक १५ जून २००९.
२) वाणिज्य परिपत्र क्र. ९६ दिनांक २० जुलै २००९.

वरील संदर्भ १ अन्वये शासनाने ग्रामिण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी जीवन संजीवनी योजना लागू केलेली आहे.

सदर संजीवनी योजनेच्या अटी व शर्ती वाणिज्य परिपत्रक क्र.९६ दिनांक २० जुलै २००९ नुसार अंमलबजावणी करीता सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात आलेल्या आहेत. वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ मधील अट क्र. २ मध्ये या योजने करीता सप्टेंबर २००९ च्या देयकात समाविष्ट थकबाकी गृहीत धरण्यात येईल असे नमुद करण्यात आलेले आहे. तथापि, या संदर्भात असे निदर्शनास आले आहे की, सप्टेंबर २००९ चे देयक वितरित करण्याच्याआधी अनेक ग्राहक संस्था या योजनेचा लाभ घेण्याकरीता पुढे आलेल्या आहेत. तरी या बाबतीत असे कळविण्यात येते की, शासन निर्णय व वाणिज्य परिपत्रकात नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन अशा ग्राहक संस्था सप्टेंबर २००९ पुर्वीच्या बिलातील थकबाकीचा भरणा करण्याची तयारी दर्शवित असल्यास अशा ग्राहकांना सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. तथापि, सप्टेंबर २००९ पासूनचे सर्व चालू वीज देयके विहित कालावधीत भरणे बंधनकारक राहील याबाब लेखी स्वरुपात हमीपत्र प्राप्त करण्यात यावेत.

संचालक (संचलन) महावितरण

**प्रत माहितीस रवाना :-**
सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, (महावितरण)
सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण,
सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण,
सर्व उपविभागीय अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण,